महाराष्ट्र शासन
कारागृह व सुधारसेवा विभाग
दुरध्वनी/फॅक्स क्र. 0712-2248844
E-mail ID :- dignagpur-mh@gov.in
विशेष पोलीस महानिरीक्षणालय(कारागृह),
पुर्व विभाग,वर्धा रोड, नागपूर-440020

जा.क्र.आस्था/रक्षक संवर्ग/गट-क/अंतिम जेष्ठतासूची/कारा.शिपाई-हवा-सुभे/प्रसिध्द/ 768 /2025,पुवि-1,नागपूर-20
दिनांक 25.03.2025

**विषय :- रक्षक संवर्गिय सुभेदार/हवालदार/कारागृह शिपाई संवार्गातील दि.1.1.2025 रोजीची अंतिम सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत.**

संदर्भ:- 1. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ दिनांक 22 जुन,2021 रोजीच्या अधिसुचने मधील बाब क्रं.3(2) (ब) I व II मधील तरतुदी
2. मा.मुख्यालय पुणे यांचेकडील परिपत्र क्र./इएसटी-2017/विबाबदली-सेवाजेष्ठता/क-1 /प्र.फा.क्र.1/4537/पुणे-1 दिनांक 7 जुन 2017
3. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.आस्था/रक्षक संवर्ग/गट-क/तातपु.जेष्ठतासुची/कारा.शिपाई-हवा-सुभे /प्रसिध्द/706/2025, दिनांक 07.02.2025

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, पुर्व विभाग,नागपुर अंतर्गत कारागृह कार्यालयाचे आस्थापनेवर दिनांक 01.01.2025 रोजी कर्तव्यावर कार्यरत सुभेदार/ हवालदार/कारागृह शिपाई संवर्गातील पदाची तात्पुरती सेवाजेष्ठता सुची उक्त संदर्भ क्रं.3 अन्वये प्रसिध्द करुन, त्यामध्ये काही त्रुटी किंवा आक्षेप असल्यास आस्थापनेवरील संबधित कर्मचाऱ्यांना दाखवुन 15 दिवसाचे आत आवश्यक त्या सबळ पुरावा व संबधित अधिक्षक्कांचे अभिप्रायासह सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार, अधीक्षक,अमरावती मध्यवर्ती कारागृह, अधीक्षक,वाशिम जिल्हा कारागृह व अधीक्षक, मोर्शी खुले कारागृह यांचे कार्यालयाकडील खालील नमुद रक्षक संवर्गिय कर्मचा-यांनी त्यांचे सेवाजेष्ठता यादीमधील उणिवा/त्रुटी दुरुस्तीबाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केलेले असुन, इतर कोणत्याही कारागृहाकडील कर्मचाऱ्यांचे आक्षेप प्राप्त झालेले नाही.

1. श्री.मुकेश एकनाथ डवले,का.शिपाई अमरावती मध्यवर्ती कारागृह- **जेष्ठता क्रमांक बाबत विनंती**
2. श्री.प्रमोद आनंदा बेले,का.शिपाई,वाशिम जिल्हा कारागृह- **जातीचा प्रवर्ग नमुद करणेबाबत विनंती**
3. श्री.श्रीकांत सुभाषराव ठाकरे, का.शिपाई मोर्शी खुले कारागृह- **जेष्ठता क्रमांक बाबत विनंती**

उक्त नमुद कर्मचाऱ्यांचे विनंती अर्जातील आक्षेपानुसार रक्षक संवर्गिय कर्मचाऱ्याचे सेवाजेष्ठता यादीत दुरुस्ती करण्यात आली असुन, सदर अंतिम जेष्ठतासुची, आपले आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या अभिलेखावरील नोंदीशी आपले स्तरावर तपासणी करुन बरोबर असल्याची खात्री करण्यात यावी. व आस्थापनेवरील सर्व रक्षक संवर्गिय कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी. तसेच सदर अंतिम जेष्ठतासुची आपले कार्यालयाचे अभिलेखावर जतन करुन ठेवण्यात यावी.

**(मा.काउमनि यांचे मान्यतेने )**

( दिलीप मोरे )
**स्वीय सहाय्यक**
**कारागृह उपमहानिरीक्षक**
पूर्व विभाग, नागपूर

प्रति,

अधीक्षक,
नागपूर/अमरावती **मध्यवर्ती कारागृह**
अकोला/यवतमाळ/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/भंडारा/वाशिम **जिल्हा कारागृह**
गडचिरोली/मोर्शी **खुले कारागृह**

प्रत:- कारागृह उपमहानिरीक्षक,मध्य विभाग,औरंगाबाद/पश्चिम विभाग,पुणे-6/दशिक्ष विभाग,भायखळा,मुंबई-8 व नाशिक विभाग,नागपुर यांना माहितीस्तव अग्रेषित.

**प्रतिलिपी**:- मा.अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक,म.रा.पुणे-1 यांना माहीतीस्तव सादर.